# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा

विधी सेवा सदन, जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीच्या पाठिमागे,
सदर बझार, सातारा
दूरध्वनी क्रमांक – ०२१६२ २९८७८४ ईमेल – supdtdlsa.satdc-mh@gov.in

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा मार्फत विधी स्वयंसेवकांचे (Para Legal Volunteers) निवडीकरीता अटी व शर्ती

मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या विधी स्वयंसेवक योजनेअंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, सातारा मुख्यालय येथे तसेच जिल्हयातील सर्व तालुका विधी सेवा समिती येथे विधी स्वयंसेवकांची एक वर्षा करिता निवड करावयाची आहे.

१) अर्जदार सातारा जिल्हयातील रहिवासी असणे आवश्यक आहे.

२) अर्जदाराचे वय १८ वर्षपेक्षा जास्त असावे.

३) अर्जदारास समाजातील वंचित, दुर्बल व गरजू व्यक्तींना कायदेविषयक माहिती व शासकीय/ विधी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी काम करण्याची इच्छा असावी.

४) अर्जदाराने NALSA/महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण/जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडून आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

५) निवड झालेल्या विधी स्वयंसेवकास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या तसेच संबंधित तालुका विधी सेवा समितींच्या आदेशानुसार काम करावे लागेल.

६) कोणत्याही व्यक्तीकडून विधी सेवा मिळवून देण्याच्या मोबदल्यात पैसे, भेटवस्तू किंवा अन्य कोणताही लाभ स्वीकारता येणार नाही.

७) विधी स्वयंसेवकाने कोणत्याही राजकीय पक्षाच्या/संघटनेच्या प्रचारासाठी PLV म्हणून मिळालेल्या पदाचा किंवा ओळखीचा वापर करू नये.

८) विधी स्वयंसेवकाची नियुक्ती ही नियमित शासकीय/ न्यायालयीन नोकरी समजली जाणार नाही व त्यातून कोणत्याही प्रकारचा कायमस्वरूपी सेवाहक्क निर्माण होणार नाही.

९) विधी स्वयंसेवकास NALSA/महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण/जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने वेळोवेळी निश्चित केलेले मानधन/भत्ता लागू असल्यास, नियमानुसार देण्यात येईल.

१०) निवड प्रक्रिया ही अर्जांची छाननी, मुलाखत, प्रशिक्षण इत्यादी प्राधिकरणाने ठरविलेल्या प्रक्रियेनुसार केली जाईल.

११) अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची/खोटी आढळल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येऊ शकते.

१२) विधी स्वयंसेवकाने NALSA Scheme for Para-Legal Volunteers, लागू नियम, मार्गदर्शक सूचना व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१३) मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यानी दिलेल्या नियमानुसार विधी स्वयंसेवक यांना प्राधिकरणाकडून दिलेल्या कामाबाबत, त्यांनी दिलेल्या सेवेचे नियमाप्रमाणे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा तसेच तालुका विधी सेवा समिती यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे ज्या दिवशी काम दिले जाईल फक्त त्या दिवशीचेच मानधन अनुज्ञेय राहील. त्यांना मानधनाशिवाय कोणत्याही प्रकारचे वेतन, मोबदला अथवा मजुरी देण्यात येणार नाही.

१४) विधी स्वयंसेवक म्हणून सेवा देण्यास इच्छुक असलेल्या सातारा जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षक व शासकीय कर्मचारी, विद्यार्थी, समाजकार्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, विधी महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, सेवा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे/महामंडळांचे अराजकीय सदस्य, स्वयं मुदत / बचत गटातील साक्षर महिला ज्यांचे नावे कोणत्याही प्रकारच्या फौजदारी गुन्हयांची नोंद नाही, अशा व्यक्तींना अर्ज सादर करता येतील.

१५) अर्जदार व त्याच्या रक्तातील नातेवाईकावर संबंधीत फौजदारी न्यायालयात खटले चालु किंवा प्रलंबीत नसावेत. कोणत्याही प्रकराचे प्रकरण प्रलंबीत नसल्याबाबचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६) विधी स्वंयसेवक करीता अर्ज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा, तालुका विधी सेवा समिती (तालुका न्यायालय) या कार्यालयातून निःशुल्क प्राप्त करावेत किंवा जिल्हा न्यायालय, सातारा संकेत स्थळावर उपलब्ध राहतील.

१७) अर्जदाराने त्याचा फोटो, शैक्षणिक कागदपत्रे, व इतर शैक्षणिक कागदपत्रे, संगणक प्रमाणपत्रे, आधारकार्डसंपर्क क्रमांक, असे स्पष्ट लिहिलेले जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सातारा किंवा संबंधित तालुका विधी सेवा समिती येथे येथे दिनांक ०३/१०/२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सादर करावेत. ई-मेलद्वारे तसेच पोस्टाद्वारे प्राप्त झालेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाही याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

१८) विधी स्वयंसेवकांच्या पात्रतेसंबंधी, तसेच योजनेच्या सविस्तर माहितीकरिता www.nalsa.gov.in या संकेतस्थळावर जाऊन Para Legal Volunteers या योजनेवरील सविस्तर माहिती पहावी.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सत्यमेव जयते सातारा

दि. २२ सप्टेंबर, २०२६

आदेशावरुन,

अधिक्षक,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा

विधी स्वयंसेवक **(PARA LEGAL VOLUNTEER – PLV)**

अर्ज नमुना

पासपोर्ट आकाराचे छायाचित्र

प्रति,

मा. सचिव,

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा

१. वैयक्तिक माहिती :–

| अ.क्र. | तपशील | अर्जदाराने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पूर्ण नाव | |
| २ | जन्मतारीख व वय | / / वय – वर्षे महिने |
| ३ | लिंग | पुरुष / महिला / इतर |
| ४ | वैवाहिक स्थिती | विवाहित / अविवाहित / इतर :– |
| ५ | कायमस्वरूपी पत्ता | |
| ६ | सध्याचा पत्ता | |
| ७ | मोबाईल क्रमांक | |
| ८ | ईमेल आयडी | |
| ९ | व्यवसाय | |
| १० | विधी क्षेत्रातील अनुभव (असल्यास) | |
| ११ | अर्जदाराचे विशेष कौशल्य / इतर माहिती | |
| १२ | आपले विरुध्द फौजदारी खटले चालू किंवा प्रलंबीत आहे का? असल्यास त्याचा तपशिल | |

२. शैक्षणिक पात्रतेचा तपशील व इतर शैक्षणिक पात्रता (संगणक पात्रता/टंकलेखन इ.) :-

| अ.क्र. | परीक्षा / पदवी | शिक्षण मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी / टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

३. सामाजिक कार्य / अनुभवाचा तपशील :-

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | केलेल्या कामाचे स्वरूप | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

४. अर्जदाराचे घोषणापत्र :-

मी याद्वारे घोषित करतो/करते की, वरील अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. सदरची माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आलेस माझी नियुक्ती रद्द होण्यास पात्र ठरेल. विधी स्वयंसेवक (Para Legal Volunteer – PLV) म्हणून माझी नियुक्ती झाल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या सूचना, नियम व अटींचे पालन करून प्रामाणिकपणे कार्य करीन.

तसेच, विधी स्वयंसेवक म्हणून कार्य करताना कोणत्याही व्यक्तीकडून अनधिकृतपणे पैसे अथवा मोबदला स्वीकारणार नाही आणि प्राधिकरणाच्या कार्यास बाधा येईल असे कोणतेही कृत्य करणार नाही.

दिनांक : / /२०२६ अर्जदाराची स्वाक्षरी :

ठिकाण : ... ... ... ... ... अर्जदाराचे नाव : ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

सोबत :

१. आधारकार्ड / ओळखपत्राची प्रत २. शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे
३. सामाजिक कार्य / अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) ४. इतर आवश्यक कागदपत्रे

# तालुका विधी सेवा समिती, ..............................

विधी स्वयंसेवक **(PARA LEGAL VOLUNTEER – PLV)**

अर्ज नमुना

प्रति,

मा. सचिव,

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा

| पासपोर्ट आकाराचे छायाचित्र |
|---|

१. वैयक्तिक माहिती :–

| अ.क्र. | तपशील | अर्जदाराने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पूर्ण नाव | |
| २ | जन्मतारीख व वय | / / वय – वर्षे महिने |
| ३ | लिंग | पुरुष / महिला / इतर |
| ४ | वैवाहिक स्थिती | विवाहित / अविवाहित / इतर :– |
| ५ | कायमस्वरूपी पत्ता | |
| ६ | सध्याचा पत्ता | |
| ७ | मोबाईल क्रमांक | |
| ८ | ईमेल आयडी | |
| ९ | व्यवसाय | |
| १० | विधी क्षेत्रातील अनुभव (असल्यास) | |
| ११ | अर्जदाराचे विशेष कौशल्य / इतर माहिती | |
| १२ | आपले विरुध्द फौजदारी खटले चालू किंवा प्रलंबीत आहे का? असल्यास त्याचा तपशिल | |
| १३ | यापूर्वी विधीस्वयंसेवक म्हणुन काम केले का ? असल्यास ठिकाण | |

२. शैक्षणिक पात्रतेचा तपशील व इतर शैक्षणिक पात्रता (संगणक पात्रता/टंकलेखन इ.) :-

| अ.क्र. | परीक्षा / पदवी | शिक्षण मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी / टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

३. सामाजिक कार्य / अनुभवाचा तपशील :-

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | केलेल्या कामाचे स्वरूप | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

४. अर्जदाराचे घोषणापत्र :-

मी याद्वारे घोषित करतो/करते की, वरील अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. सदरची माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आलेस माझी नियुक्ती रद्द होण्यास पात्र ठरेल. विधी स्वयंसेवक (Para Legal Volunteer – PLV) म्हणून माझी नियुक्ती झाल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या सूचना, नियम व अटींचे पालन करून प्रामाणिकपणे कार्य करीन.

तसेच, विधी स्वयंसेवक म्हणून कार्य करताना कोणत्याही व्यक्तीकडून अनधिकृतपणे पैसे अथवा मोबदला स्वीकारणार नाही आणि प्राधिकरणाच्या कार्यास बाधा येईल असे कोणतेही कृत्य करणार नाही.

दिनांक : / /२०२६ अर्जदाराची स्वाक्षरी :

ठिकाण : ... ... ... :.. ... अर्जदाराचे नाव : ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

सोबत :

१. आधारकार्ड / ओळखपत्राची प्रत २. शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे
३. सामाजिक कार्य / अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) ४. इतर आवश्यक कागदपत्रे